स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखा अंतर्गत "इतिहास" विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच. डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणा-या शोध प्रबंधाची रुपरेषा

संशोधन विषय

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिश नागरिकांचे योगदान - चिकित्सक विश्लेषण

संशोधक

श्री. शेख इस्माईल शमशोद्दीन

सह- शिक्षक

श्री शारदा भवन हायस्कूल, अर्धापूर.

ता. अर्धापूर, जि. नांदेड.

मार्गदर्शक

डॉ. अरविंद पी. सोनटक्के

इतिहास विभाग प्रमुख,

दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, भोकर

ता. भोकर, जि. नांदेड.

डिसेंबर -2024

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिश नागरिकाचे योगदान - चिकित्सक विश्लेषण.

प्रस्तावना:-

"व्यापारी म्हणुन आले आणि रज्यकर्ते बनले" हे वाक्य आपण नेहमी ऐकत असतो. ब्रिटिशांनी आपल्या देशावर राज्य निर्माण करण्यापुर्वी 31 डिसेंबर 1600 ला निव्वळ व्यापाराच्या उद्दात्त हेतूने ईस्ट इंडिया कंपनीची स्थापन केली होती. भारतासोबत मसाल्यांच्या व्यापारात भाग घेण्यासाठी ही कंपनी काम कारणार होती. 1612 मध्ये मुघल बादशाह कडून त्यांना व्यापार करण्याची परवानगी मिळाली त्यामध्ये कापुस , रेशीम, नील असे अनेक वस्तू / पदार्थ होते. 18 व्या शतकात कापुस व्यापारात घट झाली आणि चहा ही महत्वाची आयत बनली.

23 जून 1757 रोजी प्लासीच्या युद्धाने बंगालचा मोठा भाग ब्रिटिश अधिपत्याखाली आला. 22 ऑक्टोबर 1764 रोजी बक्सारच्या युद्धाने भारताच्या भविष्यातील स्वातंत्र्याच्या मार्गावर पाणी फिरवले.

व्यापारी राज्य विस्तार करु लागले यामुळे साम्राज्यवादाला सुरुवात झाली. आणि हे भारतीय नागरिकांना मान्य नव्हते. भारताच्या सर्व स्तरातील राजकारणात ब्रिटिशांनी हस्तक्षेप सुरु केले. ब्रिटिशांनी भारताच्या स्वातंत्र्यावर आणु पाहलेली गदा / गुलामी / पारतंत्र्य जसे भारतीयांना मान्य नव्हती तशीच ती भूमिका काही ब्रिटिश नागरीकांनी घेतली होती. अनेक ब्रिटिश विचारवंत, तज्ञ, सामान्य ब्रिटीश नागरिक, पत्रकार यांनी भारतीय स्वतंत्र्य चळवळीला पाठींबा दर्शविला होता.

ब्रिटिशांनी आपल्या देशातील निरक्षरता पाहुन आपल्या नागरिकांसाठी शिक्षणाची दारे उघडून दिली. इंग्रजीचे ज्ञान प्राप्त झाल्यामुळेच अनेक राष्ट्रीय नेते निर्माण झाले. लॉर्ड ऑलन ह्युम यांनी 1885 मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापनाकेली आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याची बिजे रोवली गेली. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावे असे अँलन ह्युम यांना वाटत होते. अनेक ब्रिटीश नागरिकांनी क्रांतिकारकांनाही सर्वतोपरी मदत केली. राष्ट्रीय संभोच्या असहकार चळवळ, सविनय कायदेभंग, चले जाव चळवळ या मोठ्या आंदोलनालाही प्रभावित होऊन अनेक ब्रिटीश नागरीकांनी सहकार्य केले.

भारतातील ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यामुळे भारतातील सर्व जातीधर्माचे लोक एक झाले. त्यातच ब्रिटिश नागरिकांशिवाय भारतीयांना स्वातंत्र्य मिळाले नसते. याचे महत्वाचे कारण म्हणजे शिक्षण, राष्ट्रीय सभा, संघर्ष अंदोलने चळवळ, सत्याग्रह यातुन 15 अगस्ट 1947 ला भारताला ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड माऊंटबॅटन यानी स्वातंत्र्य दिले.

1: विषयाची निवड :-

भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर अनेक संशोधक विद्यार्थी यांनी अनेक स्वातंत्र्यविर, क्रांतिकारी, नेते यांवर अभ्यास केलेला आहे भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर अनेक संशोधने जरी झालेले असले तरी ब्रिटिश नागरिकांनी भारतीय स्वतंत्र्य लढ्यात दिलेल्या योगदाना बदल परिपूर्ण संशोधन झालेले नाही.

भारतीय स्वतंत्र्य लढ्याच्या काळात बिटिश नागरिक यांनी सामाजिक व शैक्षणिक, अंधश्रद्धा अशा अनेक बाबतीत सुधारणा केलेल्या आहेत. त्यावर अनेक लेखक, इतिहासकार यांनी संशोधन केले, लिखाण केलेले आहे परंतु त्यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल लिखाण झाले नाही म्हणुन प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

2. विषयाची व्याप्ती:-

भारतात ब्रिटिशांची सत्ता व सत्तांतरण याचा इतिहास संपूर्ण जगात चर्चीला जाणारा विषय आहे. भारतीय नागरिकांनी स्वातंत्र्यसाठी नेहमी अहिंसा, हिंसा, चळवळ, आंदोलने, सत्याग्रहे करून लढा दिला आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे स्वरूप खुप व्यापक, खुप मोठे आहे, यांचा बारकाईने अभ्यास केल्यास ब्रिटिश नागरिकांच्या योगदानाचा आढावा घेणे तितकेच महत्वाचे आहे. ईस्ट इंडिया कंपनीचे आगमन ते भारत स्वातंत्र्य दिन (1600 ते 1947) या कालावधीसाठी या विषयीची व्याप्ती मर्यादित राहणार आहे.

3. **विषयचे महत्वः-**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक भूमिपुत्रांनी, स्त्रिय-पुरुष, सर्व जाती धर्माच्या लोकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, समोरून, भूमिगत होऊन, लिखाण करून जागृती करून जो सहभाग नोंदवला, भाग घेतला त्याला खुप खुप महत्त्व आहे. ब्रिटिशांच्या विरुद्ध अनेक क्रांतीकारी घटना घडल्या त्यापण प्रेरणादायी आहेत. या बद्दल काहीच दुमत नाही. या सर्व प्रेरणा राष्ट्रीय सभेतून, इंग्रजी वर्तमानपत्रातून, शिपायाचे बंड या सर्वांना काही ब्रिटिश नागरिकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत केली, प्रेरणा दिली, सहाय्य केले अशा अनेक ऐतिहासिक बाबीचा मागोवा, पाठपुरावा घेणे महत्वाचे ठरते.

ब्रिटिश नागरिकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग / योगदानाच्या नोंदीचा अभ्यास विस्ताराने केला जाईल.

4. संशोधन पद्धती :-

प्रस्तुत विषयासंबाधी उपलब्ध होणा-या संदर्भ ग्रंथांचा, गॅझेटीअरचा, छायाचित्रे, नकाशे जुने वृत्तपत्रे यांचे या विषयाच्या संशोधनासाठी अध्ययन करण्यात येइल.

1. प्राथमिक आणि दुय्यम साधने अभ्यासासाठी वापरण्यात येतील.
2. संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी इतिहास संशोधन पध्दतीची निवड केली जाईल.

5. संशोधनाची उिदष्टे :-

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्याची पार्श्वभूमी अभ्यासणे.

2. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा अभ्यास करणे.

3. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भारतातील ब्रिटिश नागरिकांचे योगदान अभ्यासणे.

4. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ग्रेट ब्रिटन मधील ब्रिटिश नागरिकांचे योगदान अभ्यासणे.

6 प्रकरणाची रूपरेषा:-

1. प्रस्तावना.

2. भारताची भौगोलिक पार्श्वभूमी

3. ब्रिटिशांचे आगमन आणि सत्तेचा विस्तार.

4. भारतीय स्वातंत्र्य प्रारंभिक चळवळी

5. भारत स्वतंत्र चळवळीत ब्रिटिश नागरिकांचे योगदान.

6. निष्कर्ष

1. प्रस्तावना:-

प्रस्तुत विषयचे मी चिकित्सक विश्लेषण करणार आहे म्हणजे संबधित विषयवर किंवा संशोधन समस्येशी संबंधीत असलेल्या संशोधनाचे पुनरावलोकन करणार आहे. चिकित्सक विचार प्रक्रिया म्हणजे तर्कशुद्ध विचार करण्याच क्षमता भारतीय स्वातंत्र्य लढयातील ब्रिटिश नागरीकांचे योगदान विषयी संबंधीत माहितीचे वतुनिष्टपणे विश्वेषण आणि परीक्षण केले जाणार आहे. या चिकित्सक विचार प्रक्रिये मध्ये तत्कालिक (1600-1947) पारास्थितीचा विचार केला जाणार आहे यासाठी विश्वसनीय पुरावे, कारणमीमांसा, संकलनात्मक ज्ञान सुस्पष्ट निकष, सुसंगत संदर्भ वापरून ब्रिटीश नागरिकांच्या योगदानचा आणि भारतीय स्वातंत्र्य लढयातील संबंधाचा शोध घेतला जाईल.

2. भारताची भौगोलिक पार्श्वभूमी:-

भारताची भौगोलिक पार्श्वभूमीमुळे भारताच्या समृद्धीचे आणि संपन्न्तेचे आकर्षण जगभरातील सर्वच साम्राज्यांना होते. पोर्तुगीज, डच, फ्रेंच तसेच ब्रिटिश व्यापा-यांनी भारतीय उपखंडात प्रवेश केला. भारत जगातील 7 व्या क्रमांकाच्या सर्वात मोठा देश आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ 3,287,263 चौ. किमी आहे. भारत उतारेकडून दक्षिणेकडे 3.214 कि मी. आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे 2.9 33 कि. मी. आहे त्याचि 15,200 किं. मी. जमीन सीमा आहे आणि 7516.6 कि. मी किनारपट्टी आहे. भारताच्या फाळणीच्या वेळी 1947 मध्ये तयार झालेला रेडक्लिफ लाईन नुसार पाकिस्तान व बांगलादेशच्या सीमारेषा रेखाटण्यात आल्या आहेत. भारत देशाचे भौगोलिकदृष्ट्या हिमाच्छादित पर्वत, वाळवंट, दख्खनचे पठार असे प्रादेशिक विभाग पडतात.

3. ब्रिटिशांचे आगमन आणि सत्तेचा विस्तार:-

ब्रिटीश भारतात प्रथम व्यापारी म्हणून आले त्यांनी व्यापारासाठी भारतीय भूमी निवडली ब्रिटीश चतुर, धूर्त, मुत्सद्दी होते त्यानी भारताच्या कायदेशीर व्यवस्थेत प्रवेश केला. ब्रिटीशांना सत्तेची भूक, व्यापर आणि ब्रिटीश वसाहतींचा विस्तार करण्याची महत्वकांक्षा यामुळे त्यांनी भारतातील विविध प्रदेशामध्ये आपले पाय रोवण्यास सुरुवात केली आणि विस्तार केला. 1613 मध्ये मुघल सम्राट जहांगीरने ब्रिटिशांना सुरत येथे कारखाना विकसित करण्याची परवानगी दिली 1615 मध्ये मुघल व ब्रिटिश यांच्यात व्यापारी करार झाला हीच त्यांच्या आगमनाची पहिली पायरी होय. 1621 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय नागरिकांसाठी नविन कायदे, नियम तयार करण्यास सुरवात केली. “ब्रिटीश सत्तेच्या विस्ताराच्या" दिशेने ब्रिटीशांचे हे पहिले पाऊल होते.

'ब्रिटिश सत्तेचा विस्तार' १६०० च्या आसपास ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेनंतर या कंपनीला भारतात दक्षिण पूर्व आशिया आणि भारतात व्यापारामधे गुंतवणुक करण्याच विशेष अधिकार देण्यात आला. "भारतात ब्रिटिश सत्तेचा विस्तार" शक्य झाला कारण त्या काळात भारत एकसंघ नव्हता विविध प्रदेशात विखुरलेला होता, ही वेगवेगळी राज्ये स्वबळावर स्वतंत्र होती, ज्या मुळे ब्रिटिशांना राज्यांशी परस्पर व्यापार व लष्करी युती करण्यास मदत झाली. त्यांनी आपल्या धुर्त मुत्सदेगिरीद्वारे प्रादेशिक राजयांमधील सत्ताधारी व्यवस्थेचा ताबा मिळवण्यास सुरवात केली.

1858 ला भारतीय उपखंडात नविन ब्रिटिश प्रणालीची स्थापना करण्यात आली. नंतर भारताची सत्ता "राणी व्हिकटोरियाकडे" हस्तांतरित करण्यात आली. 1876 ला "राणी व्हिक्टोरिया" भारतीय उपखंडाची सम्राज्ञी म्हणून घोषीत करण्यात आले. ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराच्या गतीला तीन संभव्य गोष्टी कारणीभूत ठरल्या.

अ. प्रचंड पैसा, ब. . व्यापारी संबध क . भौगोलिक राजकारण

ब्रिटिश विस्ताराचे तिन महत्वपूर्ण टप्पे:

I) व्यापारवाद

II) बाजारपेठ निर्माण करणे

III) साम्राज्यवाद

ब्रिटिशांनी भारत जिंकला आणि स्थानिक राजे, नवाब यांना गुलाम करून "ब्रिटिश सत्तेच विस्तार " सुनिश्चित केला. या अनुभवजन्य डावपेचांमुळे ब्रिटीश आणि ब्रिटीश सरकारला भारतात ब्रिटिश सत्तेचा विस्तार करण्यास मदत झाली.

4. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रारंभिक चळवळी :-

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ऐतिहासिक घटनांची मालिका होती. त्याचा अंतिम उददेश भारतातील ब्रिटिश राजवट संपवणे हा होता, हा स्वातंत्र्य लढ़ा 1857 ते 1947 पर्यंत चालला, भारतीय स्वांत्र्यासाठी पहिली राष्ट्रवादी क्रांतिकारी चळवळ बंगालमधून उदयास आली राष्ट्रीय सभेने अशा अनेक चळवळीचा पाया भक्कम केला. 20 व्या शतकात लाल बाल पाल यांनी स्वराज्यासाठी प्रयत्न

के 1920 मध्ये स्वराज्य संघर्षांचा शेवटी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधी यांचा अहिंसा आणि सविनय कायदेभंगांच्या धोरणाचा अवलंब केला.

रौलेट कायद्या विरोधात सशस्त्र क्रांती झाली विशेषत: पंजाब मध्ये जालियनवाला बाग हत्याकांडाद्वारे ब्रिटिशानी हे आंदोलन हिंसक पणे दडपवले. सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेसच्या निशिक्रीयते मुळे निराश होऊन 'आझाद हिंद सेना' स्थापन केली.

भारतीय स्वातंत्र्य चळवळी मध्ये सतत वैचारिक बदल होते होते वसाहतविरोधी चळवळ, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक आणि नागरी स्वातंत्र्यवादी अशा विचारांच्या राजकीय संरचनेसह स्वतंत्र आर्थिक विकासाच्या दृष्टीने पूरक होती.

1930 नंतर या चळवळींनी मजबुत समाजवादी प्रवृत्ती स्वीकारली. स्वातंत्र आंदोलनामुळे शेवटी भारतीय स्वातंत्र्य कायदा 1947 तयार होऊन भारतातील ब्रिटीश राजवट संपुष्टात आली आणि देशाचे विभाजन होऊन पाकिस्तान निर्माण झाला.

5. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश नागरिकाचे योगदान:-

ब्रिटिश राज (1858-1947) मध्ये इंग्रजी शिक्षित भारतीयांचे सहकार्य मागीतले जे ब्रिटिशा - साठी अनुकूल होते. 1858 मध्ये सर एलन हयूमने, " भारतीय राष्ट्रीय संघ तयार करण्यासाठी ब्रिटिश व्हाईसरायची परवानगी घेऊन स्थापन केली ही नविन राजकीय संस्था “भारतीय जनमताचे व्यासपीठ" म्हणून काम करणार होती आणि ब्रिटिश सरकारशी संलग्न होती. 28 डिसेंबर 1858 रोजी मुंबईतील पहिल्य अधिवेशनात 72 प्रतिनिधि उपस्थित होते. हयूम हे सरचिणीस तर व्योमेश चंद्र बॅनर्जी अध्यक्ष होते. पुढील काळात लॉर्ड ए. ओ. हयुम, लॉर्ड माउंट बॅटन, फ्रेडा बेदी, डॉ. अनी बेझंट, मैडलिन स्पेड इत्यादीनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे योगदान दिले होते. इस्ट इंडिया कंपनीच्या वाढत्या अत्याचारावर अनेक ब्रिटिश नागरिकांनी आक्षेप घेतला 1857 च्या उठावातील शिपायांना ब्रिटीश नागरिकांनी त्यांच्यावर चालणा-या खटल्यात त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न केले. या प्रमाणे काळाच्या पडद्याआड असे अनेक ब्रिटीश नागरिक आहेत. ज्यांनी भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्त व्हावे या साठी प्रयत्न केले आहेत. त्यात प्रत्यक्ष ब्रिटीश भूमीवर पार्लमेंट मध्ये भारताची बाजू मंडळी तर काही ब्रिटीश नागरिकांनी प्रत्यक्ष भारत भूमीवर येऊन भारतीय स्वातंत्र्याची वाटचाल सोयीस्कर होईल या साठी प्रयत्न केले आहेत. अशा अनामिक उदारमतवादी ब्रिटीश नागरिकांचे

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान यांचा अभ्यास करून या प्रकरणात त्याची चिकित्सक मांडणी करणार आहे.

6. निष्कर्ष:-

या प्रकरणात संशोधन आणि अभ्यासातून निघालेले निष्कर्ष दिले जाणार आहेत. प्रस्तुत संशोधन रुपरेषा स्थूल स्वरूपात असून संशोधना दरम्यान त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. “भारतीय स्वातंत्र्य लढयातील ब्रिटिश नागरिकांचे योगदान : चिकित्सक विश्लेषण" या विषयावर संशोधन कार्य करायचे आहे.

प्रस्तुत संशोधनाची रुपरेषा स्थुल स्वरूपाची असुन संशोधना दरम्यान यामध्ये गरजेनुसार संशोधन मार्गदर्शकांच्या सूचनेनुसार योग्य ते आवश्यक असे बदल केले जातील. संशोधन कार्यात वापरल्या जाणा-य साधनाच उल्लेख केला जाईल. संदर्भाची योग्य नॉद घोली जाईल. आवश्यकतेनुसार टिपा, तळटिपा, परिशिष्ट जोडण्यात येतील. प्रबंधाच्या शेवटी संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ साधनांची सूची देण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ सुचीः-

1. Sen, S.N., History of the freedom Movement in India (1857-1947) Wiley Eastern Ltd. Bombay 1993
2. British Empire in India. Anmol Publication, New Delhi -110002
3. Role of press and Indian freedom struggle A. P. H. Publishing Corporation, New Delhi - 110002
4. डॉ अनिल कठारे, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास (1858-1947), प्रशांत पब्लिकेशन.
5. स्वा. सावरकर, 1857- चे स्वातंत्र्य समर
6. वि.सं. वाळवी, सत्तावन ते सत्तेचाळीस (खंड-1 व खंड- 2)
7. रियासतकार गो. स. सरदेसा,ई ब्रिटिश रियासत (खंड -1 व खंड-2)
8. प्र. न. जोशी, भारतीय स्वातंत्र्य इतिहास, स्नेहवर्धन पब्लिशींग हाऊस, पुणे-30

गॅझेटिअरः-

1) Source Material for History of freedom movement civil.
2) Gazetteers Dept. of MH , Bombay Second Edition R-1975

मार्गदर्शक

डॉ. अरविंद पी. सोनटक्के

प्राध्यापक व विभाग प्रमुख

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर,

ता. भोकर, जि. नांदेड.

संशोधक

श्री. शेख इस्माईल शमशोद्दीन

सह- शिक्षक

श्री शारदा भवन हायस्कूल,अर्धापूर

ता. अर्धापूर, जि. नांदेड.